सन २०१७-१८ मध्ये मराठवाडा विभागासाठी १००% राज्य पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना राबविण्यासाठी रु.१४३५ लाख निधी वितरीत करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः सुसिंयो-२११७/प्र.क्र.२०८/१७/१४अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: १३ मार्च, २०१८

वाचा-

१. **शासन निर्णय क्रमांक सुसिंयो-२११५/प्र.क्र.३८२/४अे, दि. १४ ऑक्टोबर, २०१६.**
२. **वित्त विभागाचे परिपत्रक क्र. - अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८ एप्रिल, २०१७.**
३. **वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.९७/ अर्थ-३, दि.३० जून, २०१७.**
४. **शासन निर्णय क्रमांक सुसिंयो-२११७/प्र.क्र.१०७/१७/४अे, दि. ७ ऑगस्ट, २०१७.**
५. **शासन निर्णय क्रमांक सुसिंयो-२११७/प्र.क्र.२०८/१७/४अे, दि, ७ ऑक्टोबर, २०१७.**
६. **वित्त विभागाचे परिपत्रक क्र. - अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. ६ फेब्रुवारी, २०१८.**

प्रस्तावना-

मराठवाडा विभागात सतत पडणाऱ्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध पाण्यामध्ये जास्तीत जास्त क्षेत्र सुक्ष्म सिंचनाखाली आणण्याच्या उद्देशाने, संदर्भाधीन अ.क्र. १ येथील दि. १४ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये, मराठवाडा विभागासाठी १००% राज्य पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना सन २०१६-१७ ते २०१८-१९ या ३ वर्षाच्या कालावधीसाठी राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयानुसार ३ वर्षाच्या कालावधीत सुमारे ३३७ कोटी रकमेचा कार्यक्रम राबवावयाचा आहे. सदर योजनेची सन २०१७-१८ या वर्षात अंमलबजावणी करण्यासाठी, रु.१४३.५० कोटी एवढी तरतूद करण्यात आली आहे. वित्त विभागाच्या संदर्भाधीन अ.क्र.३ येथील दि. ३० जून, २०१७ च्या परिपत्रकानुसार सदर तरतूदीपैकी ७०% च्या मर्यादेत रु.१००.४५ कोटी निधी संदर्भाधीन अनु.क्र.५ येथील दि. ७ ऑक्टोबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये कृषी आयुक्तालयास वितरीत करण्यात आला आहे. वित्त विभागाने संदर्भाधीन अनु.क्र.६ येथील दि.६ फेब्रुवारी, २०१८ च्या परिपत्रकान्वये, सन २०१७-१८ या वर्षातील महसूली कार्यक्रम खर्च/भांडवली अनिवार्य कार्यक्रम खर्च या बाबींवरील खर्चाची मर्यादा ८०% एवढी विहित केली आहे. त्यानुसार, मंजुर तरतूदीपैंकी ८०% च्या मर्यादेत उर्वरित रु.१४.३५ कोटी निधी खर्च करण्यासाठी कृषी आयुक्तालयास BDS प्रणालीवर वितरीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. अनुषंगाने शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:

१. सन २०१७-१८ या वर्षी मराठवाडा विभागासाठी १००% राज्य पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजना राबविण्यासाठी रु.१४३५ लक्ष (अक्षरी: रुपये चौदा कोटी पसत्तीस लाख फक्त निधी आयुक्त कृषी यांना BDS प्रणालीवर वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर निधी खालील लेखाशिर्षाखालील सन २०१७-१८ या वर्षातील मंजूर तरतूदीतून खर्च करण्यात यावा.

मागणी क्र.डी-३

२४०१, पीक संवर्धन

(००) ११९, बागायाती व भाजीपाला पिके

(०३) रोपमळे

(०३) (३५) १००%राज्य पुरस्कृत सूक्ष्म सिचंन योजना (केंद्र पुरस्कृत सूक्ष्म सिचंन अभियानासी समांतर) (२४०१९४४७)

३३ - अर्थसहाय्य

३. सदर निधी लाभार्थ्यांना PFMS प्रणालीद्वारे वितरीत होत असल्याची खातरजमा आयुक्त, कृषी यांनी करावी.

४. सदर निधीचे स्वतंत्र लेखे ठेवण्यात यावेत.

५. सदर निधी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत सन २०१७-१८ या वर्षात प्राप्त अर्जांसाठी, उपलब्ध निधीच्या मर्यादेत पूर्वसंमती देऊन वापरण्यात यावा.

६. सदर निधीतून मराठवाडा विभागातील शेतकऱ्यांना २ हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत अनुदान देण्यात यावे. सदर निधीचे जिल्हा निहाय वितरण करण्यास तसेच खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी कृषी संचालक (फलोत्पादन) यांना राज्य नियंत्रक म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच सदर निधीचे आहरण व संवितरण करणेसाठी विविध स्तरावरील अधिकाऱ्यांना पुढीलप्रमाणे नियंत्रण तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे:-

अ.क्र.	स्तर	नियंत्रण अधिकारी	आहरण व संवितरण अधिकारी
१.	आयुक्तालय स्तर	संचालक (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय, पुणे	सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२.	विभाग स्तर	संबंधित विभागीय कृषी सह संचालक	संबंधित विभागीय कृषी सह संचालक कार्यालयातील लेखाधिकारी
३.	जिल्हा स्तर	संबंधित जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी	संबंधित जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयातील लेखाधिकारी
४.	उप विभागीय स्तर	संबंधित उप विभागीय कृषि अधिकारी	संबंधित उप विभागीय कृषि अधिकारी
५.	तालुका स्तर	संबंधित तालुका कृषी अधिकारी	संबंधित तालुका कृषी अधिकारी

७. योजनेची अंमलबजावणी करताना प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेच्या प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन) घटकाच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना तसेच संदर्भाधीन अ.क्र.४ येथील दि. ७ ऑगस्ट, २०१७ च्या शासन निर्णयातील अटी/शर्ती व कार्यपद्धतीमध्ये पालन करण्यात यावे.

८. सदर निधी खर्च करताना तो विहित कार्यपध्दती अनुसरून, सर्व वित्तीय कायदे/ नियमांचे/ प्रक्रियेचे व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत बजेट व कोषागार नियमावलीनुसार खर्च करण्याची कार्यवाही अमंलबजावणी यंत्रणानी करावी. कोणत्याही परिस्थितीत कुठल्याही शासन निर्णयाचा वा परिपत्रकाचा भंग होणार नाही, याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रिय कार्यालयाची राहील.

९. सदर निधी खर्च करताना वित्त विभागाच्या दि. १८ एप्रिल,२०१७ च्या व दि. ३० जून, २०१७ च्या परिपत्रकातील अटी व शर्तीचे व वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१०. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परीपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. ६ फेब्रुवारी, २०१८ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१३१५२६५२२७०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2018.03.13 15:27:44 +05'30'

(श्रीकांत आंडगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त (कृषी),कृषी आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती)
२) मा.मंत्री (कृषी व पणन) यांचे खाजगी सचिव
३) मा.राज्यमंत्री (कृषी व पणन) यांचे खाजगी सचिव
४) प्रधान सचिव (कृषी) यांचे स्विय सहायक
५) सर्व संचालक, कृषी आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे
६) विभाग प्रमुख, एकात्मिक जल व्यवस्थापन, महात्मा फुले कृषी विद्यापिठ, राहुरी
७) विभाग प्रमुख, सिंचन व निचरा अभियांत्रिकी, महात्मा फुले कृषी विद्यापिठ, राहुरी
८) विभाग प्रमुख, सिंचन व निचरा अभियांत्रिकी, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापिठ, परभणी
९) विभाग प्रमुख, सिंचन व निचरा अभियांत्रिकी, डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापिठ, दापोली
१०) विभाग प्रमुख, सिंचन व निचरा अभियांत्रिकी, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापिठ, अकोला
११) विभागीय कृषी सहसंचालक (औरंगाबाद व लातुर)
१२) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी (औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी व हिंगोली)

१३) मंडळ कृषी अधिकारी/तालुका कृषी अधिकारी (मराठवाडा विभागातील)
१४) जिल्हा कोषागार अधिकारी (औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी व हिंगोली)
१५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षण) महाराष्ट्र -१/२ मुंबई/नागपुर
१६) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
१७) संचालक, लेखा व कोषागार, मुंबई
१८) मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई, वाशी.
१९) उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,कोकण/नाशिक/पुणे/औरंगाबाद/अमरावती/नागपुर
२०) उप संचालक, लेखा व कोषागारे कोकण/नाशिक/पुणे/औरंगाबाद/अमरावती/नागपुर
२१) सर्व कार्यासने व पर्यवेक्षिय अधिकारी (कृषी) कृषी व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
२२) निवडनस्ती.